# घटक ३ : कथा

## (ब) वळीव — शंकर पाटील

अनुक्रमणिका


**३.० उद्दिष्टे**

**३.१ प्रास्ताविक**

**३.२ शब्दार्थ, वाक्प्रचार म्हणी आणि टिपा**

**३.३. कथेचे अध्ययन**

३.३.१ तात्याच्या मनातील ताण

३.३.२ तात्याच्या मनातले वादळ

३.३.३ तात्या आणि त्याची बायको

**३.४ नमुना उत्तरे**

**३.५ अधिक अध्ययन**

३.५.१ लेखकपरिचय

३.५.२ समीक्षकांची मते

३.५.३ संवादाचे कार्य

३.५.४ कथासौंदर्य – निवेदन शैली

३.५.५ कथेतील निसर्ग

**३.६ सारांश**

**३.७ सरावासाठी स्वाध्याय**

**३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## ३.० उद्दिष्टे

'कथा' या साहित्यप्रकाराचा परिचय व्हावा, कथेची व्याख्या आणि तिचे स्वरूप तुम्हाला समजून घेता यावे या दृष्टीने कथेचे अध्ययन करावयाचे आहे. कथेच्या अध्ययनानंतर तुम्हाला –

अ) तात्याच्या मनातील ताण-तणाव आणि त्यातून कथा कशी फुलत गेली आहे ते लक्षात येईल.
ब) या कथेच्या रचनेची अंगे तुम्ही स्पष्ट करू शकाल.
क) ग्रामीण बोली आणि ग्रांथिक भाषा यांच्यामधील वेगळेपण उदाहरणांच्या साहाय्याने तुम्ही सांगू शकाल.
ड) ऊनाची खाई उसळली त्यामुळे जे वातावरण निर्माण झाले आणि वळीव पडल्यावर जी प्रसन्नता आली त्याचे वर्णन करण्यासाठी जे शब्द, जी वाक्ये लेखकाने योजली आहेत ती तुम्ही सांगू शकाल.
इ) कथेमध्ये 'निसर्ग' हे तात्या सारखेच महत्त्वाचे पात्र आहे. हे तुम्ही स्पष्ट करू शकाल.

## ३.१ प्रास्ताविक

घटक ३ (अ) मध्ये अरविंद गोखले यांची 'कातरवेळ' ही कथा अभ्यासलीत. त्यामुळे तुम्हाला कथेची व्याख्या, तिचे स्वरूप, तिची भाषा यांचा परिचय झाला. आता तुम्हाला ग्रामीण जीवनाशी संलग्न असलेला अनुभव कथारूपाने कसा व्यक्त होतो त्याचे अध्ययन करावयाचे आहे. 'वळीव' ही कथा श्री. शंकर पाटील यांची आहे.

'ग्रामीण' हा शब्द वर्णनात्मक किंवा वैशिष्टचदर्शक आहे. कोणताही अर्थपूर्ण अनुभव विशिष्टतेचे कवच फोडून सर्वस्पर्शी होतो तेव्हा त्याला कलात्मक रूप प्राप्त झाले असे आपण मानतो. ग्रामजीवनातून जीवनरस शोषून तरारलेली कथा केवळ ग्रामीण नसते, तर ती माणसांची कथा असते. एका व्यक्तीचा अनुभव सर्वांचा होणं ही प्रक्रिया सतत चालू असते. तुम्हाला ही कथा आवडेल. प्रथम ही कथा संपूर्ण वाचा. मोठ्याने वाचा. लेखकाने या कथेचे स्वतःच कथन केले आहे ते एकाग्रतेने ऐका कॅसेटवर आणि कथेचा आस्वाद घ्या.

## ३.२ शब्दार्थ, वाक्प्रचार, म्हणी आणि टिपा

**वळीव** – पावसाळ्यापूर्वी अकस्मात येणारा पाऊस
**खाई** – आग
**खोप** – शेतातली लहान झोपडी
**उष्मा** – उकाडा
**पैरण** – अंगात घालावयाचा सदरा
**खेंड** – गोवरीचा किंवा लाकडाचा पेटलेला तुकडा
**पेव** – धान्य भरून ठेवायची जमिनीखालची हवाबंद जागा
**भुई** – जमीन
**कायली** – अंगाची तगमग
**कार** – कहार
**गेळा** – पाण्यासाठी असणारा निमुळत्या मानेचा घडा
**डगर** – चढण
**फडाणा** – कापडाचा तुकडा
**बडमी** – कडब्याची लहानशी गंज
**साप्प** – साफ
**सांगावा** – निरोप
**कूड** – तुरकाट्या, सरमाड आदीपासून बनवलेली भिंत
**पाखाड** – छपराची उतरती बाजू
**भस्मसात** – राख झालेले

**गावदरी** – गावालगतचा ओसाड भाग
**वाफसा** – जमीन पेरणीला योग्य होणे
**वाघाट** – एक फळ
**नालसाब** – मोहरममध्ये अंगात संचार झालेली व्यक्ती
**गुमान** – मुकाटयाने
**ऐदान** – पहार
**कडवाळ** – चाऱ्यासाठी उन्हाळयात घेतलेले ज्वारीचे पीक
**म्हऊ घातल्यागत** – मोहिनी घातल्याप्रमाणे
**वंगाळ** – वाईट
**गदमदत असणे** – उकाडयामुळे घामाघूम होणे
**कलंडणे** – लवंडणे, विसाव्यासाठी आडवे होणे
**भेलकांडू लागणे** – तोल जाणे
**हबकाच बसणे** – अकस्मात मनाला मोठा धक्का बसणे

## ३.३ कथेचे अध्ययन

आता तुम्हाला कथेचे सूक्ष्म अध्ययन करावयाचे आहे. ते नीट करता यावे म्हणून कथा विभागशः वाचा. त्या त्या भागाखाली प्रश्न दिले आहेत. त्याची उत्तरे देता येतील. अध्ययन संपल्यावर तुम्ही आपले उत्तर सुचवलेल्या नमुना उत्तराशी पडताळून पाहा.

### ३.३.१ तात्याच्या मनातील ताण

ऊनाची खाई उसळली होती. वारा अजिबात थांबला होता. आकाश ढगाळून येऊन सारखं गदमदत होतं. बसल्या जागी अंग घामानं भिजत होतं. सावलीला म्हणून खोपीत बसलं तरी बाहेरच्या झळा आत येत होत्या. उष्माच भयंकर वाढला होता.

खोपीत निवांत पडलेल्या तात्या देसायाला अशा ह्या ऊनानं गदमदत होतं. एखादया भट्टीगत अंग आतल्या आत शिजत होतं. पडल्या जागी चैन पडेना तसा तात्या उठून बसला. अंगातली पैरण काढून त्यानं घाम पुसला आणि उघडया अंगावर वारा घेत तो बसून राहिला. लुकलुक हलणाऱ्या मानेनं पाठीची कमान करून तो दोन्ही पायांवर बसून वारा घेत राहिला, पण कायली काय कमी होत नव्हती. सारी भूमीच खेंडागत धगधगत होती. गार सावलीला बसूनही अंग शिजत होतं. हवेत एक तऱ्हेचा विचित्रच उकाडा होता. वाराच बंद झाला होता. पेवात कोंडलेल्या धान्यागत माणसाची अवस्था झाली होती.

पैरण हातात घेऊन तात्या एकसारखा हात हलवत होता. थरथरत्या हातांनी वारा घेऊन घेऊन तात्याचे हात भरून आले. हात दमले आणि काही इलाज चालेना झाला; तसा तात्या आपल्या हाताचे दोन्ही पंजे भुईला रेटून गुमान बसून राहिला.

बाहेर ऊनाकडे डोळे उघडून बघवत नव्हतं. बुबळं बाहेर पडत होती. तात्या आपली मान गुडघ्यात घालून पायाच्या तळव्याकडे बघत बसून राहिला. बसल्या बसल्या अंग घामानं चिकचिकून गेलं, तसा तात्यानं पैरणीचाच पिळा केला आणि अंगाला तिडा देऊन तो पाठ पुसू लागला. अंग कितीही पुसलं तरी घाम काही हटत नव्हता. मारुतीगत अंग सारखं पाझरतच होतं. कुठंतरी घालून घ्यावंसं वाटू लागलं. एखादया डोहात जाऊन उडी घ्यावीशी वाटू लागली. कायलीच सहन होईना झाली.

बसल्या जागेसनंच हात लांब करून तात्यानं गेळचातलं थंड पाणी मडक्यात घेतलं आणि गटागटा पाणी पिऊन झाल्यावर बसल्या जागी तो धापा टाकू लागला. लुकलुक हलणारी मान सावरत आणि पिपरणीच्या पानागत थरथरणाऱ्या पंजाची बोटं आधारासाठी जमिनीला टेकवून तो बसून राहिला. ऊन खाली होण्याची तो वाट बघू लागला.

अशा या ऊनाच्या कारात एक गडी डगर चढून वर आला आणि तात्या बसला होता त्या खोपीकडे येऊ लागला. ऊनानं टाळकं तडकू नये म्हणून त्यानं चारपदरी धोतराचा एक फडाणा डोईवर पांघरला होता. त्याच्या चालीबरोबर तो लपाक लपाक हलत होता. त्या आवाजानं तात्यानं खाली घातलेली मान वर उचलून विचारलं, "कोण हाय रं?"

जवळच बूड टेकून त्यानं सांगितलं, "म्या, माळयाचा सखुबा हाय जी. ऊन लई तावाय लागलंय तात्या." असं म्हणून तो पाय पसरून सप्पय बसला आणि धोतरानं घाम पुसत म्हणाला, "थंड

पाणीबिणी तर काय हाय का?"
"ते हाय बग गेळचात. कुठं गेलतास हिकडं अशा रखरखीत उनात?"
आधी दोन मडकी गार पाणी पिऊन तोंड पुसत सखुबा म्हणाला, "गेलतो कबनूरला."
"आधीमधीच तिकडं का?"
"सकाळी सांगावा आला होता."
तात्या दचकून म्हणाला, "का रं?"
"सासरा गेला की तात्या."
"ते कशानं रं? काय पडला होता व्हय?"
"दुखणं न्हाई फिकणं न्हाई - काय न्हाई बघा. आकस्मात बिचाऱ्याला मराण आलं."

विरुद्ध दिशेला तोंड करून बसलेला तात्या सावकाश अंगाभोवती वळून बसला आणि सखुबाच्या तोंडाकडं बघत म्हणाला, "असा अवचितच कसा गेला गा?"

"आता कसा!" असं एकदा स्वतःशीच म्हणून सखुबा सांगू लागला, "सासू भाकरी घेऊन रानात गेली. सासरा भाकरी खायाला म्हणून हिरीत जाऊन हातपाय धुऊन आला. पायऱ्या चढून खोपीपतुर कसाबसा आला ते भुईला कलंडला .... कलंडला ते गप्पगारच झाला. सासू अजून भाकरीचं गटळं सोडत होती तवरच सारा खेळ आटपला. असं का म्हणून सासू जवळ जाऊन बघती तर काय बोलणं न्हाई, चालणं न्हाई. सगळं जिथल्या तिथं थंड. काय कळलंच न्हाई. मला अमुक हुतंय असं सांगायला त्यानं तोंडच उघडलं न्हाई. काळच आला अवचित त्याला त्यो तरी काय करणार? काय बघा की मराण!"

थंड बसलेल्या तात्याच्या मनात चलबिचल सुरू झाली. भांबावलेल्या मनानं तात्या दोन्ही हात हलवून म्हणाला, "सखुबा, खुळ्या हे काय खरं न्हवं बघ. माणसाचा भरवसाच ऱ्हायला न्हाई. माणूस आता हाय तर मागनं न्हाई अशातली गत झालीया. काय ऐकायचं आणि काय!"

असं म्हणून तात्या मुकाटयानं बसून राहिला. आपली लुकलुक हलणारी मान गुडघ्यात घालून खालच्या भुईकडे नजर लावून बसला. तात्या थंड बसून राहिला तरी तळ ढवळला होता. भांडयात पाणी घेऊन त्यात नळीनं फुंकावं तसे उमाळे वर येत होते.

..... पावसाचं, वाऱ्याचं काय म्हणून रानात जात असशीला? थंड घरात पडायचं सोडून इनाकारणी दुसऱ्याच्या जिवाला घोर लावायचा! .......

तात्या मुका होऊन बसून राहिला, तसा सखुबा धोतराचा फडाणा पुन्हा डोक्यावर घेऊन म्हणाला, "बरं, उठतो आता. काय ढगबी जमल्यात. वाऱ्याच्या आधी घर गाठतो."

न बोलताच तात्यानं मान हलवली आणि लपाक लपाक असा डोईवरच्या फडाण्याचा आवाज करीत सखुबा डगर उतरून गावच्या वाटेला लागला.

• • •

तुम्ही एवढा भाग नीट वाचा, मनन करा.

'ऊनाची खाई उसळली होती' असा आरंभ करून लेखकाने तात्या देसायाला कसं गदमदत होते त्याचे वर्णन केले आहे.
खालील वाक्ये लक्षपूर्वक बघा–
१. एखाद्या भट्टीगत अंग आतल्या आत शिजत होतं
२. सारी भूमीच खेंडागत धगधगत होती
३. मारुतीगत अंग सारखं पाझरत होतं
४. एखाद्या डोहात जाऊन उडी घ्यावीशी वाटू लागली

तसेच उष्मा असहय झाल्यामुळे तात्या देसायाच्या हालचाली कशा चालू होत्या त्यातील बारकावे लेखकाने कसे टिपले आहेत ते पहा –
१. थरथरत्या हातांनी वारा घेऊन तात्याचे हात भरून आले
२. तात्या आपली मान गुडघ्यात घालून पायांच्या तळव्याकडे बघत बसून राहिला
३. तात्यानं पैरणीचा पिळा केला आणि अंगाला तिडा देऊन तो पाठ पुसू लागला

या वर्णनामुळे तुमच्या डोळ्यांपुढे चित्र उभे राहते आणि आवश्यक ते वातावरण निर्माण होते.

माळचाचा सखुबा येतो. थंडगार पाणी पिऊन त्याला तरतरी येते. सखुबा 'सासरा अचानक गेला' असे सांगतो आणि तात्याचे चित्त अस्वस्थ होते. तात्याच्या मनात ताण-तणाव निर्माण होतो.
तो उद्गारतो, "माणसाचा भरवंसाच ऱ्हायला न्हाई"

तात्याचे हे वाक्य त्याच्या मनात खोल दडून बसलेल्या भयाचे निदर्शक आहे. हे भय कोणते? तात्याच्या मनात मृत्यूचे भय खोल दडलेले आहे.

आता तुम्ही जेवढा भाग नीट वाचलात त्याचे आकलन झाले आहे हे पाहण्यासाठी 'स्वयं अध्ययन' या शीर्षकाखाली प्रश्न दिले आहेत. या प्रश्नांची नमुना उत्तरे पुढे दिली आहेत. अगोदर स्वतंत्रपणे उत्तरे दर्शवलेल्या जागी लिहा आणि मग नमुना उत्तरांशी पडताळून पाहा.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) **जागा भरा**

१. एखाद्या ............. अंग आतल्या आत शिजत होतं.

२. सारी भूमीच ............. धगधगत होती.

३. पेवात कोंडलेल्या ............. माणसाची अवस्था झाली.

(ख) खालील शब्दांतून ग्रामीण बोलीतील शब्द कोणते ते निवडा व रकान्यात लिहा.
सावली, खोप, पैरण, झळा, खेंड, पेव, कायली, डोह, गेळा, फडाणा, सांगावा, गटळं, न्हाई, भुई, डगर, वाट.

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

(ग) **खालील वाक्ये पूर्ण करा.**

१. कायली सहन होईना म्हणून तात्याच्या मनात आले की –
..........................................................................................................

२. तात्याच्या मनात चलबिचल सुरू झाली; कारण –
..........................................................................................................

३. तात्या मुका होऊन बसून राहिला; कारण –
..........................................................................................................

## ३.३.२ तात्याच्या मनातले वादळ

सखुबा लांब जाऊन दिसेनासा झाला आणि एकाएकी वाऱ्याची झळूक अंगावर आली. आडवंतिडवं पळत सुटलेलं वारं खोपीत शिरून अंगाभोवतीनं फिरू लागलं. खोपीचा कूड वाजू लागला. खोप गदागदा हलू लागली. डोईवरचं छप्पर अंतराळी झालं. छप्पर उडून जातंय का काय म्हणून तात्यानं वर बघितलं, तर पाखाडात खोवलेली कुऱ्हाड निसटायच्या बेतात आली होती. ती काढायला म्हणून तात्या गडबडीनं उठून उभा राहिला तर वारं काय सुचू देईना झालं. शिडात वारं घुसावं तसा पंजाचा सोगा तात्याच्या दोन्ही तंगड्यांतनं मागं पळू लागला. पुढं पाऊल टाकता येईनासं झालं. वारं वाट अडवून उभं राहिलं. वर हात करून पाखाडातली कुऱ्हाड काढायला जमेना झाली. नीट दिसेनाही झालं. बाहेरची माती डोळ्यांत शिरू लागली. अंग भेलकांडू लागलं. एका हातानं कुडाचा आधार घेऊन तात्यानं ती कुऱ्हाड कशीतरी काढून घेतली आणि उडणारी माती डोळ्यांत जाऊ नये म्हणून डोळे झाकून तो बसून राहिला. वेताळागत सुटलेलं वारं कानांत घुमू लागलं. डोळे उघडायचीही सोय राहिली नाही.

चक्री वारं अंगाभोवती घुमत घुमत निघून गेलं आणि ढगांची झुंबरं हलू लागली. पांढरे ढग काळे होऊ लागले. लहान लहान ढगांचे तुकडे एकमेकांत मिसळून आकाश भरून आलं. ऊन दिसेनासं होऊन होरपळणारी रानं सावलीखाली झाकून गेली आणि एकाएकी गडगडाट सुरू झाला.

खाली मान घालून बसलेला तात्या गुडघ्यांवर हाताचा रेटा देऊन उभा राहिला. पडदा आलेल्या डोळ्यांनी वर आकाशाकडे बघू लागला. धुकं पडावं तसं सारं अंधारून आलं होतं. ढग गर्जना करीत होते. मावळतीकडून लाल धुळीचे लोट चाल करून येत होते. गावच्या गाव आगीत भस्मसात झाल्यागत लाल धूळ गगनाला जाऊन भिडली होती. सैरावैरा धावणारं हे वाऱ्याचं घोडदळ वेगानं जवळ येत होतं. बघता बघता वीज चमकू लागली आणि पाण्यानं भरलेले काळे ढग जवळ येऊ लागले.

तात्यानं पाठ फिरवली. रानात कामं चालली होती तिकडं हात वर करून हाळी दिली. गार वाऱ्याच्या झुळका अंगावर येऊ लागल्या तशी तात्यानं खोपीत येऊन मघाशी काढून ठेवलेली पैरण अंगात घातली, घोंगड्यावर पडलेला रूमाल डोक्याला बांधला, कान गच्च झाकून घेतले आणि पैरणीच्या गुंड्या घालून तात्या पोराची आणि गडीमाणसांची वाट बघू लागला.

जोराचा वारा सुटून गार झुळुका अंगाला झोंबू लागल्या. पालापाचोळा उडू लागला. हां हां म्हणता वादळी वारं वाजत आलं आणि समोर धावेवर उभं असलेलं चिंचेचं जुनं झाड एकसारखं करकरू लागलं. झाडावर असलेला वाघाटयाचा वेल वाऱ्यानं झेप घेऊ लागला. पिकलेली वाघाटयाची फळं देठ तुटून खाली पडू लागली. समोर दिसणारं गाव धुळीनं वेढगटून गेलं. तात्या गावाकडे टक लावून बघत राहिला; पण वादळात सापडलेली घरं दिसेनाशी झाली. वाऱ्यानं गावंदरीची झाडं झोकांड्या खाऊ लागली. घिरट्या घालणारे पक्षी हेलकावे खाऊ लागले आणि पावसाचे टपोरे थेंब अंतरा-अंतरावर पडू लागले.

तात्याला एकाएकी हल्लकं वाटू लागलं. पाऊस पडून जमिनीला वाफसा यावा तशी मनाची स्थिती झाली. न पेरलेलंही उगवून यावं तसे नको ते विचार मनात येऊ लागले. कानांत चिंचेचं झाड करकरू लागलं. खोपीत एकटाच बसलेला तात्या हवालदिल होऊन सोबतीची वाट पाहू लागला.

रानातली गडीमाणसं धावत खोपीत आली. पोराला बघून तात्याला जरा आधार वाटला. तोंडावर पडलेले पावसाचे शिंतोडे पुसत शिवराम खोपीच्या तोंडाला उभा होता. तात्या त्याच्या तोंडाकडे टक लावून बघाय लागला. एवढ्यात वीज चमकून लख्खकन प्रकाश शिवरामच्या तोंडावर पसरला.

"..... शिवराम, बाळा तेवढं ऐदान तर टाक रं अंगणात. तुम्ही कशाला निघालाय भाईर? पायाळू माणसानं इजा कडाडताना भाईर कशाला पडावं?...."

तात्यानं थरथरत्या हातानं जवळ पडलेली कुऱ्हाड उचलून बाहेर अंगणात टाकली आणि तोंडालाच उभ्या असलेल्या आपल्या पोराकडे बघून तात्या म्हणाला, "गावाकडं दैना उडाली जणू शिवराम. वाराच मुलखायेगळा सुटलाय."

शिवराम समोर वादळात सापडलेल्या गावाकडे बघत म्हणाला, "अरारारा! काय वारं म्हणायचं का काय हे!"

सगळेच थक्क होऊन समोर बघत राहिले. वादळानं हैदोस उडवला होता. गावंदरीच्या बडमी कलंडत होत्या. कलंडलेल्या बडमींतून पेंढ्या बाहेर पडत होत्या. बांधाबांधानं पळत होत्या. पालापाचोळा घारीगत वर जात होता. डेरेदार झाडं वाऱ्यानं ओणवी होऊन भुईला नाक घासत होती.

"झालं की वय आता. नाक भुईला घासाय लागलं. कवाबी पुटुकनं जायचं आता!"
"तुला काय होती मरायला धाड!"
"असं हसण्यावरी न्हेऊ नका...... लांब काशी-रामेश्वर ऱ्हाऊं द्या, पर शिंगणापूरचा म्हादेव आणि गोकर्ण तर तेवढं करू. जीवमान हाय तंवर तेवढं सोमवार उजवून टाकू. आता का फुडं ढकलायचं?"

विजा जास्तच लखलखू लागल्या तसे तोंडाला उभे राहिलेले गडी मागं सरून खाली बसले. बसल्या जागेसनं जीव मुठीत धरून बाहेर बघू लागले. एवढ्यात डोळे दिपवून टाकणारा लख्खकन प्रकाश पडला. जमीन हादरून गेली आणि कडाडा SSS असा विलक्षण विजेचा कडकडाट, साऱ्या आसमंतात दुमदुमून गेला. कान बधीर होऊन गेले. साऱ्या अंगालाच हिसका बसल्यासारखा झाला.

●●●

तुमच्या लक्षात येईल की, एकाएकी वारे सुटले. त्या वाऱ्यांमुळे कोणता परिणाम झाला?
ही वाक्ये वाचा –

१. खोपीचा कूड वाजू लागला.
२. खोप गदगदा हलू लागली.
. डोईवरचं छप्पर अंतराळी झालं.
४. वारं वाट अडवून उभं राहिलं.
५. बाहेरची माती डोळ्यात शिरू लागली.

लेखक सगळे बारकावे टिपतो आणि ते वर्णन तुमच्या डोळ्यांसमोर चित्र उभे करते. वाऱ्याचा वेग वाढतो तसे काळे-पांढरे ढग आकाशात घुमू लागतात. 'ढगांची झुंबरं हलू लागली' एवढ्या एकाच वाक्यात लेखक कसे सुंदर चित्र उभे करतो ते पाहा.

सखुबाच्या बोलण्यातून सासऱ्याच्या अवचित निधनाची बातमी तात्याने ऐकली आणि मृत्यूच्या भयाने तो हादरून गेला. आता तर वाऱ्याचे घोडदळ वेगाने धावू लागले. वीज चमकू लागली आणि तात्या देसायाच्या मनाला चिंतेने घेरून टाकले. पण तात्या हवालदिल का झाला? त्याचे उत्तर शोधण्यापूर्वी खालील प्रश्न सोडवून पाहा –

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(घ) 'अ' गटात वाक्याचा अर्धा भाग आहे. 'ब' गटातील उर्वरित भाग जोडा आणि वाक्य तयार करा.

| | |
|---|---|
| १. वेताळागत सुटलेलं वारं | १. सावलीखाली झाकून गेली |
| २. वाऱ्याचं घोडदळ | २. एकसारखं करकरू लागलं |
| ३. होरपळणारी रानं | ३. हेलकावे खाऊ लागले |
| ४. चिंचेचं जुनं झाड | ४. कानात घुमू लागलं. |
| ५. घिरट्या घालणारे पक्षी | ५. धुळीनं वेडगटून गेलं |
| ६. समोर दिसणारं गाव | |

(ङ) लेखकाने वाऱ्याचे वर्णन कितीतरी वाक्यांतून केले आहे.
खालील वाक्यांतून वाऱ्याचे वर्णन करणारी वाक्ये निवडा आणि लिहा.

१. एकाएकी गडगडाट सुरू झाला
२. जोराचा वारा सुटून गार झुळुका अंगाला झोंबू लागल्या
३. कानात चिंचेचं झाड करकरू लागलं
४. आडवं तिडवं पळत सुटलेलं वारं खोपीत शिरलं
५. सैरावैरा धावणारं वाऱ्याचं घोडदळ वेगानं जवळ येत होतं
६. अंग भेलकांडू लागलं.
७. वेताळागत सुटलेलं वारं कानात घुमू लागलं.

(च) या वाचलेल्या भागात लेखकाने वारा, विजा, पाऊस, पालापाचोळा, झाडे इत्यादीसंबंधी विधाने केली आहेत. उदाहरणार्थ 'पालापाचोळा धारीगत वर जात होता' हे वाक्य पाहा. तुम्ही याच तऱ्हेने या पाठातील तुम्ही वाचलेल्या भागातून वाक्ये लिहू शकाल.

वारा : ____________________

वीज : ____________________

पाऊस : ____________________

झाडे : ____________________

जमीन : ____________________

ढग : ____________________

वाघोट्याचा वेल : ____________________

(छ) खालील वाक्ये कोणी म्हटली आहेत? का?

१. "तुला काय होती मरायला धाड!"

२. "पायाळू माणसानं इजा कडाडताना भाईर कशाला पडावं?"

३. "काय वारं म्हणायचं का काय हे!"

## ३.३.३ तात्या आणि त्याची बायको

"कुठंतरी ईज पडली गड्या," असं म्हणून तात्यानं घाबऱ्या घाबऱ्या डाव्या हाताच्या बोटांनी उजव्या हाताची करंगळी चाचपून बघितली. बोटात अंगठी नाही हे बघून त्याला हबकाच बसला. बसल्या जागी तो भुई चाचपू लागला.

जवळ बसलेला शिवराम म्हणाला, "काय बघाय लागलाय?"
करंगळी चाचपून तात्या बोलला, "बोटातली अंगठी पडली जणू रे."
अंगठी नाहीशी झाली हे कळताच सगळेच गडी कावरेबावरे झाले. घाबरे होऊन बघू लागले. बसलेली जागा हातानं चाचपून एकानं विचारलं, "किती तोळ्याची होती?"
शिवराम हसून म्हणाला, "किती तोळ्याची कुठली, तांब्याची होती!"

सगळेच हसायला लागले तसा तात्या कसनुसा हसून म्हणाला, "पायाळू म्हणूनशान म्हातारीनं मुद्दाम घालाय लावली होती हातात. आता ईज कडाडताना तिची आठवण झाली. कुठं सकाळी घरात इसारली

का आणि कुठं पडली काय कळंना."
दुसऱ्या एकानं विचारलं, "पायाळू माणसाला इजंचं भ्या असतंय व्हय?"

तात्या काही बोलायला तोंड उघडणार एवढ्यात समोरच वीज नागागत सळसळली – काळ्या पाटीवर पेन्सिलीनं रेघ ओढावी तशी. वीज समोर लखलखून गेली आणि वारा पुन्हा एकदा जोरानं वाहू लागला. पाऊस वाजत आला आणि मातीचा खरपूस वास दरवळून गेला. चिंचेचं झाड अंगात नालसाब आल्यागत करू लागलं. खोपीत शिरलेल्या वाऱ्यानं छप्पर उचललं जाऊ लागलं. ढग मोठ्यानं गडगडू लागले. कुडासकट खोप उडून जायची भीती वाटू लागली. अंगाचं मुटकुळं करून बसलेला तात्या पोराला म्हणाला, "म्हातारी एकटीच घरात काय करत असंल कुणाला दक्कल!"

जोरानं सुटलेल्या वाऱ्यानं चिंच होलपटली जाऊ लागली. झाडावरचा वाघाट्याचा वेल झेप घेऊन बाहेर आला. वाऱ्यानं उचकटून निघालेला हा वेल टोपीतनं जर निघावा तसा दिसू लागला. चेंडू फेकल्यागत वाघाटे अंगावर येऊन पडू लागले. चिंचेनं तर खाली अंथरूणच पसरलं. पाऊस आडवातिडवा झोडू लागला. पायाखाली पाणी येऊ लागलं. पावसाबरोबर गाराही पडू लागल्या. अंगणात वाळवण पसरावं तसा गारांचा सडा दिसू लागला. शिवराम आणि गडीमाणसं गारा वेचू लागली.

वाऱ्याचा जोर कमी होऊन पाऊस कुडपू लागला. वारं शिरून अंतराळी झालेली खोप हलायची थांबली. कुडातनं आडवा घुसणारा पाऊस नीट धार धरून पडू लागला. समोर साचलेल्या पाण्यात थेंब नाचू लागले. हातांतल्या गारा विरघळून गेल्या. जो तो थंडीनं काकडून गेला. दोन्ही पाय पोटात घेऊन आणि हनुवटी गुडघ्यावर टेकवून आखडून बसलेला शिवराम चंची काढून बोलू लागला, "कडवाळातली कणसं किती खुडली रं म्हारुत्या?"

कोपऱ्यातल्या हाऱ्याकडे बोट दाखवून म्हारुत्या म्हणाला, "जरा कमी निम्मा हारा भरलाय की."
"बास? येवढीच?"
"तिसऱ्यापारी तर कडवाळात शिरलो होतो. तंवर ह्या पावसानं घोटाळा केला न्हवं?"
"लेका, पाऊस पडला हे काय वंगाळ झालं व्हय?"
दुसरा एकजण लांबनं म्हणाला, "छे छे! वळीव पायजेच होता ह्या टिपनाला."
सुपारी बारीक कातरीत शिवरामनं विचारलं, "आता नांगरटीचं काम सोळा आणं जमलं का न्हाई?"

वीज कडाडायची थांबली. वाराही घोंघावायचा थांबला. शिवराम निरनिराळ्या कामांची चौकशी करू लागला. बोलणं सुरू झालं आणि लांब बसलेला येदूनाना जवळ येत म्हणाला, "तात्या, तुम्ही कायच बोलंना झालाय? जिवाला बरं हाय न्हवं?"
मघापासून खिन्न मनानं एकटाच विचार करीत बसलेला तात्या एकवार खाकरून म्हणाला,
"सखू माळी...."
"त्याचं काय झालं?"
"त्याचा सासरा गेला की. अकस्मात गेला म्हणं."
"त्यो कसा गेला? त्याला काय झालं?"
सगळेच कान देऊन ऐकू लागले. घोंगडं अंगावर घेऊन नीट सावरून बसत तात्यानं ऐकलेली हकीकत सांगून टाकली. सगळेच अबोल झाले. आपापल्या मनाशी विचार करीत बसले आणि येदूनाना एकदा खाकरून म्हणाला, "परवा आपल्या कुंभाराची म्हातारी अशीच गेली न्हाई! चालता-बोलताच गेली की हो!"

तात्या चवड्यावर बसून म्हणाला, "कोण, रामू कुंभाराची म्हातारी व्हय?"
"तर हो! अजून ऊस फोडून खात होती, आणि तिला कसं मराण आलं बघा की. चांगली हिंडती-फिरती बाई....."

जुन्या काळातली आठवण मनात येऊन तात्या म्हणाला, "अगा, आमचा पैला मुलगा जलामला तवा तिचं लगीन झालं बघ. काय तरी आम्हापरास धा-पंधरा वरसांची धाकटी असंल बघ ती. तिचं पैलं बाळंतपण म्हातारीनंच केलंय की आमच्या."

पाऊस थांबून ढग विरळ होऊ लागले. हवा स्वच्छ पडली. जिकडे-तिकडे गारेगार होऊन गेलं.

बोलणं मध्येच सोडून तात्या बेतानं उठून उभा राहिला. त्यानं घोंगड्याची खोळ डोक्यावर घेतली आणि कानाला लागणारी काठी हातात घेऊन तो न बोलताच उठून चालू लागला. तात्या हातात काठी घेऊन बाहेर पडला तसा शिवराम म्हणाला, "कुठं निघाला?"
"जातो की घराकडं."
"काय खूळ लागलंय का? पांदीला पाणी किती आलं असंल – आणि कसं जाणार?"
"पांदीला पाणी असलं तर उपाध्याच्या रानातनं आडवा जाईन तसा."

''आणि चिखलातनं पाय निघंल का वर?''
''निगतोय आपुनच,'' असं म्हणून तात्या कुणाचंच न ऐकता पुढं जाऊ लागला. वाटेत पडलेली कुऱ्हाड बघून तो उभा राहिला आणि शिवरामला म्हणाला, ''शिवराम, गड्या, आपल्या परड्यातलं लिंबाचं झाड तेवढं तोडायचं बघ.''
''ते कशाला? हाय ती सावलीबी न्हाईशी करायची व्हय? उनात जनावरबिनावर बांधायला येतं.''
''तसं न्हवं. लिंब इजंला धार्जिना असतो. ही मुद्दाम कलागत ठेवायची कशाला? ते उद्या तोडायचं बघ. आज सांच्यालाच जुळणी करून ठेव.''

असं म्हणून तात्या डगर उतरून खाली जाऊ लागला. पावसाचं पाणी अजून डगरीवरनं खाली पळत होतं. तात्या बेतानं डगर उतरू लागला. काठीनं आधी अंदाज घेऊन मग पाऊल उचलू लागला.

एवढ्यात त्याचा एक पुतण्या धापा टाकत गावाकडनं पळत येताना दिसला. पांदीनं येताना त्याचे पाय गुडघ्यापर्यंत चिखलानं भरले होते. राड लागून धोतर घाण होऊ नये म्हणून त्यानं ते मांडीपर्यंत वर खोवून घेतलं होतं. त्याला जवळ येताना बघून तात्या डगरीवरच उभा राहिला. हातापायांतनं वारं गेलेल्या त्याच्या पायाला खालच्या पाण्याची ओढ लागू लागली. पायाखालनं पळणारं पाणी तात्याला हलवू लागलं. धापा टाकत आलेला पुतण्या जवळ आला आणि तात्यानं एक आवंढा गिळून कसंबसं विचारलं, ''का रं, पळत का आलास?''
''पळू नगो तर काय करू?''
तात्या त्या डगरीवरच मटकन खाली बसत म्हणाला,
''काय झालं रं?''
''हुतंय काय? काकी दम खाऊ दिना झाल्यात न्हवं? जा, बघून ये जा, मला सांगाय लौकर ये, म्हणूनशान नुसता धायटा उडीवलाय मघाधरनं. पावसातच पिटाळाय लागल्यात. आता मग काय करायचं सांगा.'' असं म्हणून त्यानं हाताची मूठ पुढं केली आणि तो बजावून म्हणाला, ''बरं, मी जातो, गडबडीनं माघारी सांगायला. पर ही अंगठी धरा बघू. अगदी आठवणीनं घालायला सांगितलंया.''

हातावर ठेवलेल्या त्या तांब्याच्या अंगठीकडे तात्या म्हऊ घातल्यागत बघतच बसला.

• • •

या कथेच्या अखेरच्या भागात 'बोटातल्या अंगठी'चे विशेष महत्त्व लक्षात घ्या. लेखकाने प्रचलित समजुतीचा उपयोग करून घेतला आहे. 'पायाळू माणसाला विजेपासून भय असते. म्हणून त्याने आपल्या बोटात तांब्याची अंगठी घालावी' ही प्रचलित समजूत. आता ही वाक्ये वाचा.

> ''कुठंतरी ईज पडली गड्या,'' असं म्हणून
> तात्यानं घाबऱ्या घाबऱ्या डाव्या हाताच्या
> बोटांनी उजव्या हाताची करंगळी चाचपून
> बघितली. बोटात अंगठी नाही हे पाहून
> त्याला हबकाच बसला.''

तात्याचे बोलणे ऐकून सगळे हसायला लागले. पण 'बोटातली अंगठी' ही तात्या आणि त्याची बायको यांच्यातील प्रेमाचे प्रतीक होती हे तुमच्या लक्षात येईल. कथेच्या अखेरीस जे वाक्य आले आहे ते केवढा परिणाम साधते ते बघा.

> 'हातावर ठेवलेल्या त्या तांब्याच्या अंगठीकडे
> तात्या म्हऊ घातल्यागत बघतच राहिला.

म्हणून कथेची अखेरी हे तिचे पुण्यक्षेत्र आहे असे कथेचे तंत्र समजावून सांगणारे समीक्षक म्हणतात.

लेखकाने या अखेरच्या भागात 'संवादा'चा उपयोग किती चातुर्याने केला आहे! आता हाच संवाद पाहा.

> ''शिवराम, गड्या आपल्या परड्यातलं लिंबाचं
> झाड तेवढं तोडायचं बघ.''
> ''ते कशाला? हाय ती सावलीबी न्हाईशी
> करायची व्हय? उनात जनावरबिनावर
> बांधायला येतं.''
> ''तसं न्हवं. लिंब इजंला धार्जिना असतो.
> ही मुद्दाम कलागत ठेवायची कशाला? ते
> उद्या तोडायचं बघ. आज सांच्यालाच
> जुळणी करून ठेव''.

हा संवाद वाचल्यावर तुमच्या लक्षात येईल –

१. तात्या व शिवराम यांच्या स्वभावविशेषावर प्रकाश पडतो. तात्याच्या मनातील ताण आणि शिवरामची व्यावहारिक दृष्टी प्रत्ययास येते.

२. 'नाटचपूर्णता' हा त्यांच्या संवादलेखनाचा विशेष आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ज) जागा भरा.
- १. वीज ............. सळसळली.
- २. चिंचेचं झाड अंगात ............ करू लागलं.
- ३. ........... वाघाटे अंगावर येऊन पडू लागले.

(झ) खालील विधाने खरी की खोटी आहेत ते सांगा.
- १. हातातील गारा विरघळून गेल्या.
- २. तात्याच्या बोटातली सोन्याची अंगठी पडली.
- ३. वळीव नकोच होता ह्या टिपनाला.
- ४. पायाखाली पळणारं पाणी तात्याला हलवू लागलं.

(ञ) एका वाक्यात उत्तर द्या.
- १. म्हातारीने तांब्याची अंगठी मुद्दाम तात्याला हातात घालायला का लावली?
- २. वळीव पडल्यामुळे कोणता फायदा झाला?
- ३. तात्याचा पुतण्या धापा टाकत का आला?

(ट) खालील शब्दांना पर्यायी म्हणून ग्रामीण बोलीतील शब्द लिहा.

| **ग्रांथिक** | **ग्रामीण बोली** |
|---|---|
| जमीन | |
| वाईट | |
| चढण | |
| मुकाटचाने | |
| छपराची उतरती बाजू | |
| वीज | |
| चाऱ्यासाठी उन्हाळचात घेतलेले पीक | |
| मरण | |

## ३.४ नमुना उत्तरे

(क) भट्टीगत, खेंडागत, धान्यागत

(ख) खोप, पैरण, खेंड
पेव, कायली, फडाणा
न्हाई, गटळं, डगर

(ग) १. एखाद्या डोहात जाऊन उडी घ्यावी.
२. सखुबाने सासऱ्याच्या अकस्मात झालेल्या निधनाची हकीकत सांगितली.
३. तात्याच्या मनात खोल दडलेले मृत्यूचे भय उफाळून वर आले.

(घ) १. जोराचा वारा सुटून गार झुळुका अंगाला झोंबू लागल्या.
२. आडवंतिडवं पळत सुटलेलं वारं खोपीत शिरलं.

३. सैरावैरा धावणारं वाऱ्याचं घोडदळ वेगानं जवळ येत होतं.

४. वेताळागत सुटलेलं वारं कानात घुमू लागलं.

(ड) वाक्ये क्रमांक २, ४, ५, व ७.

(च) वारा : हां हां म्हणता वादळी वारं वाजत आलं.

वीज : वीज चमकू लागली.

पाऊस : पावसाचे शिंतोडे पडू लागले.

झाडे : गावंदरीची झाडं झोकांड्या खाऊ लागली.

जमीन : जमीन हादरून गेली.

ढग : ढगांची झुंबरं हलू लागली.

वाघोटचाचा वेल : वाघाटचाचा वेल वाऱ्यानं झेप घेऊ लागला.

(छ) १. तात्या म्हणतो. त्याच्या मनात मृत्यूचं भय असतं.

२. तात्या म्हणतो. पायाळू माणसाला विजेपासून भय असते ही समजूत.

३. शिवराम म्हणतो. वारा मुलखावेगळा सुटला होता त्यामुळे सारे गाव वादळातच सापडले. ते पाहून शिवराम चकित होतो.

(ज) नागागत

नालसाब आल्यागत

चेंडू फेकल्यागत

(झ) १. खरे २. खोटे ३. खोटे ४. खरे

(ञ) १. तांब्याची अंगठी बोटात असली तर पायाळू माणूस सुरक्षित असतो असे वाटून तिने तांब्याची अंगठी तात्याला हातात घालायला लावली.

२. वळीव पडल्यामुळे नांगरटीचे काम चांगले होईल.

३. तात्या पायाळू होता. त्याला वीजेपासून भय वाटू नये म्हणून म्हातारीने आठवणीने पुतण्याजवळ अंगठी तात्याला नेऊन द्यायला सांगितले.

(ट) ग्रामीण बोलीतले शब्द

१. भुई
२. वंगाळ
३. डगर
४. गुमान
५. पाखाड
६. ईज
७. कडवाळ
८. मराण

## ३.५ अधिक अध्ययन

### ३.५.१ लेखकपरिचय

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मराठी कथेत जी वृत्त्यंतरे आणि स्थित्यंतरे घडून आली त्यातून नवकथा उदयास आली हे आपण पाहिले. नवकथेची दोन रूपे आपण अभ्यासली. एक अरविन्द गोखले यांची 'कातरवेळ' आणि दुसरे शंकर पाटील यांच्या 'वळीव' या कथेचे ग्रामीण रूप

श्री. शंकर पाटील हे नवकथेच्या शिल्पकारांपैकी एक. **जन्म १९२६** मध्ये. बी.ए. (ऑनर्स) बी.टी. त्यांनी आपल्या कथांतून खेड्यातील स्त्री-पुरुषांचे मन, त्यात निर्माण झालेले ताण-तणाव, गुंतागुंत, त्यांची सुखदुःखे, त्यांचे प्रश्न यांचे चित्रण केले. वळीव, भेटीगाठी, आभाळ, धिंड, ऊन, पाहुणी, फक्कड गोष्टी, ताजमहालमध्ये सरपंच इत्यादी कथासंग्रह. 'टारफुला' ही कादंबरी. 'कथा अकलेच्या कांद्याची', 'लवंगी मिरची कोल्हापूरची' ही वगनाटचे, वावटळ, एक गाव बारा भानगडी, गणगौळण, पिंजरा, लक्ष्मी या चित्रपटकथा. नांदेड येथील अ. भा. साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष (१९८५).

## ३.५.२ समीक्षकांची मते

त्यांच्या कथालेखनाविषयी समीक्षकांची मते पाहा.

**प्रा. वा. ल. कुळकर्णी**

जीवनाचे सप्तरंगी धनुष्य जणू श्री. शंकर पाटील यांच्या कथांमधून डोळ्यांसमोर उभे राहते. हे जीवन खेड्यामधील आहे. ही माणसे खेड्यातील आहेत ही जाण आपणांस असते, नाही असे नाही. पण ती किती वेळ टिकते? एका मर्यादेनंतर ती खेड्यातील आहेत, मराठा आहेत की जैन आहेत, हा विचार मनातून हळूच निघून जातो. 'ग्रामीण कथा' हे बंधन पाटलांची कथा एका मर्यादेपलीकडे स्वतःवर लादून घेण्याचे जणू नाकारते. तिच्या ग्रामीणत्वात तिचे अनन्यसाधारणत्व थोडेफार असले तरी ते ग्रामीणत्व तिची मर्यादा ठरत नाही. ती शेवटी माणसांचीच कथा ठरते.

**प्रा. भालचन्द्र फडके**

केवळ ग्रामीण दर्शन घडवावे असा त्यांच्या कथालेखनाचा हेतू नाही. लोकप्रियता मिळवावी म्हणून गावरान किस्से सांगावेत असाही त्यांचा हेतू नाही. कथा हे त्यांचे आत्मशोधाचे साधन आहे. ग्रामीण मन ज्या समाजव्यवस्थेत वाढते आहे त्यात स्वातंत्र्य, समता इत्यादी मूल्यांची रुजवण झाली नाही याचे त्यांना दुःख वाटते. परंपरेपेक्षा परिवर्तनावर त्यांची श्रद्धा आहे.

तुम्हाला त्यांची मुलाखत वाचायला आवडेल.

कै. स. शि. भावे यांनीही त्यांची मुलाखत घेतली . ती 'ललित दिवाळी १९८५' मध्ये प्रसिद्ध झाली.

## ३.५.३ संवादाचे कार्य

तुम्ही अभ्यासलेल्या कथेतील तात्या देसायांच्या मनात मृत्यूचे भय वसते आहे हे लेखकाने संवादातून सुचवलं आहे–

तात्या दोन्ही हात हालवून म्हणाला, ''सखुबा,
खुळ्या हे काय खरं न्हवं बघ. माणसाचा
भरवसाच राहिला न्हाई. माणूस आता
हाय तर मागनं न्हाई अशातली गत झालीया.
काय ऐकायचं आणि काय!''

हा दुसरा संवाद पाहा–

''झालं की वय आता. नाक भुईला घासाया लागलं कवाबी पुट्कनं जायचं आता!''

''तुला काय होती मरायला धाड!''
''असं हासण्यावरी न्हेऊ नका....''

तात्या आणि त्याच्या पत्नीच्या संवादातून मरणाचे भयच सुचवले आहे. तात्याची कारभारीण आपल्यासमोर प्रत्यक्ष येत नाही; पण तिचे बोलके अस्तित्व या संभाषणातून जाणवते.

तसेच 'हातावर ठेवलेल्या त्या तांब्याच्या अंगठीकडे
तात्या म्हऊ घातल्यागत बघतच बसला.'
हे निवेदनातील वाक्य कारभारणीच्या मनातले मृत्यूचे भय गोचर करते.
ही वाक्ये तात्याच्या अंतर्मनातील चित्र रेखाटतात.

## ३.५.४ कथासौंदर्य–निवेदन शैली

या कथेचे सौंदर्य निवेदन शैलीत आहे. निवेदनभाषेचे तीन पदर अगदी सहजपणे एकमेकात गुंफलेले आहेत.

१. **लेखकाची निवेदनभाषा**
मारी भूमीच खेडांगत धगधगत होती.
गार सावलीला बसूनही अंग शिजत होतं.
हवेत एक तऱ्हेचा विचित्र उकाडा होता.

२. **देसायाची बोलीभाषा**
''शिवराम बाळा, तेवढं ऐदान तर टाक.
तुम्ही कशाला निघालाय भाईर?''

३) **प्रादेशिक बोली**
"कडवाळातील कणसं किती खुडली रं म्हारुत्या?"

### ३.५.५ कथेतील निसर्ग

या कथेत 'निसर्ग'ही माणसासारखाच वावरतो.ही वाक्ये वाचा.

१. खोपीचा कूड वाजू लागला.
२. वाऱ्यानं गावंदरीची झाडं झोकांड्या खाऊ लागली.

'पाऊस' येतो त्याचा प्रभाव तात्या देसायाच्या मनावरही पडतो आणि त्या गावावरही होतो.

'वळवाचे वर्णन' वाचा. त्या वर्णनातील 'चैतन्य' लक्षात येईल. नाक घासणे असा एक वाक्प्रचार या कथेत आहे.

## ३.६ सारांश

तात्या देसायाच्या मनःस्थितीचे वर्णन या कथेत आहे. उकाड्याने हैराण झालेल्या तात्याला सखबा आपल्या सासऱ्याच्या अवचित झालेल्या निधनाची हकीकत सांगतो आणि तात्याच्या मनात विलक्षण ताण-तणाव निर्माण होतो. त्याच्या मनात मृत्यूचे भय वसते आहे. वीज कडाडू लागते. पाऊस कोसळतो. त्याबरोबर 'लिंब इजेला धार्जिना' असतो असे त्याच्या मनात येते आणि ते झाडच तोडून टाकायचा विचार त्याच्या मनात येतो. तात्या पायाळू. त्याला वीज अंगावर कोसळण्याचे भय वाटते. त्याची कारभारीण तांब्याची अंगठी पाठवून देते. त्याचे मन कारभारणीच्या प्रेमामुळे मोहून जाते.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

१. तात्या देसाई आणि त्याची कारभारीण यांना कोणती काळजी वाटत होती? का?
२. पावसाचे वर्णन करणारा परिच्छेद लिहा.
३. विजा कडाडू लागतात. तात्या खोपीत आहे. तात्यांची अंगठी घरातच आहे, हे कारभारणीच्या लक्षात येते. तिच्या मनःस्थितीचे वर्णन करणारा परिच्छेद लिहा.
४. या कथेतील ग्रामीण बोलीतील काही शब्द व वाक्ये एकत्र करा आणि ग्रांथिक भाषेत ते शब्द व ती वाक्ये लिहून पाहा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

| | |
|---|---|
| १. **लघुकथा : तंत्र आणि मंत्र** | ना. सी. फडके |
| २. **सहा कथाकार** | संपादक – भालचन्द्र फडके |
| ३. **शंकर कथा** | संपादक – भालचन्द्र फडके |
| ४. **निवडक शंकर पाटील** | संपादक – वा. ल. कुलकर्णी |
| ५. **पाटिलकी** | शंकर पाटील |